दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे

## अमित शहांनी घेतली शरद पवारांची भेट

**मुंबई (वृत्तसंस्था)**–अजित पवार यांनी आज सकाळी शरद पवार यांची निवासस्थानी भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर आता सायंकाळी भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देखील शरद पवार यांची निवासस्थानी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या आहे. वाढदिवसाच्या शुभेच्छा की, भेटीमागे काही वेगळे राजकारण आहे का? अशा चर्चांना सध्या सुरुवात झाली आहे. तर शरद पवार महायुतीत येत असतील तर त्याचा आम्हाला आनंदच होईल, असे भाजपचे आमदार प्रवीण दरेकर यांनी या भेटीवर प्रतिक्रिया देताना म्हटले.शरद पवार यांचा आज ८४ वा वाढदिवस आहे. देशातील विविध क्षेत्रातील मान्यवर शरद पवार यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करीत आहेत. आज सकाळीच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रातील विविध मंत्री पवार यांना शुभेच्छापर संदेश पाठवीत होते. या दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सकाळी शरद पवार यांची सहकुटुंब आणि पक्षाच्या नेत्यांसह भेट घेतली होती. त्यानंतर आता अमित शाह यांनी देखील भेट घेतली आहे.

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार दि.१३ डिसेंबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-१०६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# देशमुख हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ बीड जिल्हा बंद

## बंद पाळण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन



**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांचे अपहरण करून निघृण हत्या केल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी (दि.१३) रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. या बंदमध्ये सहभागी होऊन व्यापारी, नागरिकांनी झालेल्या घटनेचा व जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीचा निषेध व्यक्त करावा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

सोमवारी (दि.९) रोजी केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच पती सामाजिक कार्यकर्ते स्व.संतोष देशमुख यांचे भरदुपारी अपहरण करण्यात आले आणि ३ तासांनंतर त्यांचा मृतदेह सापडला. अतिशय निघृणपणे त्यांची हत्या करण्यात आली आहे. अपहरण आणि खून यांसारखे गंभीर प्रकरण असताना प्रशासनाने या प्रकरणात योग्य भूमिका घेतली नाही. मारेकर्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न पोलीसांकडून झालेला असल्याचे दिसत आहे. जिल्ह्यातील वातावरण अतिशय दहशतीचे झाले असून यामागे काही विशिष्ट व्यक्तीविशेष आहेत. बीड जिल्ह्यात अक्षरशः बिहार सारखी परिस्थिती होत चालली आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती फोफावत चालली आहे. या प्रवृत्तीला आळा घालणे ही बाब अत्यावश्यक झाली आहे. स्व.संतोष देशमुख व त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे. ही मागणी घेऊन व झालेल्या प्रकाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी बीड जिल्ह्यातील व्यापारी व नागरिकांनी आजचा बंद पाळण्याचे आवाहन बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.




## संविधान प्रतिकृती तोडफोडीच्या निषेधार्थ महिला मोर्चाने परळी शहर दणाणले

**परळी । प्रतिनिधी**

परभणी येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळ असणाऱ्या भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची जातीयवाद्याने तोडफोड केल्याच्या निषेधार्थ परळी शहरातील सर्व आंबेडकरवादी महिला संघटनांच्या वतीने परळी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर भव्य असा मोर्चा काढण्यात आला.

शहरातील भीमनगर येथून निघालेला हा मोर्चा गणेशपार ,राणी लक्ष्मीबाई टॉवर,मोंढा मार्केट,एकमिनार चौक, बस स्टँड मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते परळी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला.मोर्चात सहभागी झालेल्या महिलांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परभणी येथील संविधान प्रतिकृती तोडफोड करणाऱ्या व्यक्ती वर दोषद्रोहचा गुन्हा दाखल करावा,या घटनेमागील खरा सुत्रधार शोधून त्यावर कारवाई करावी, तसेच हा खटला जलदगती



न्यायालयात चालवावा.

प्रजावतीताई कांबळे व अनिता रोडे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.सुत्रसंचलन रंजनाताई मस्के, आभार प्रदर्शन छायाताई रोडे यांनी मानले. या मोर्चात सीमाताई कांबळे, रमाबाई उबाळे, गवळण ताई गोखले, विमलबाई ताटे, विजयमाला आदोडे, सुनिता ताई निवंडे, गवळण बाई वाघमारे, द्वारकाताई रोडे, सुमनबाई सरवदे, पार्वतीबाई वाघमारे, श्रद्धा जगतकर, गोदावरी केदारे, प्रज्ञा तरकसे, अनिता चक्रे, सविता हजारे, संभावना रोडे, सुनंदा हनवते, कल्पना बुक्तर, सानिया कांबळे, वैष्णवी गोदाम, रूपाली कसबे, वंदना गायकवाड, भारती मस्के यांच्यासह हजारो महिला उपस्थित होत्या.

## परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ आज रांजणी बंद

**जालना । असलम कुरेशी**

परभणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेकर यांच्या पुतळयासमोरील ठेवण्यात आलेल्या भारतीय संविधानाच्या प्रतीची विटंबना करणाऱ्या आरोपीस कडक शासन करण्याच्या मागणीसाठी शुक्रवारी आंबेडकरी समाज बांधवांच्या वतीने रांजणी बंदची हाक देण्यात आली आहे.

यासंदर्भात घनसावंगीच्या तहसीलदार व पोलिस निरिक्षक यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की परभणी शहरातील भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेकर यांच्या पुतळ्या समोरील ठेवण्यात आलेल्या संविधानाच्या प्रतीची तोडफोड करणाऱ्या जातीवादी व मनुवादी इसमास कडक शासन करून त्याचावर देशद्रोहीचा गुन्हा दाखल करावा. सदरील व्यक्तीच्या



पाठीमागे कोणाचा हात आहे याची सखोल चौकशी करावी. या घटनेचा घनसावंगी तालुक्याच्या वतीने व रांजणी शहराच्या वतीने तीव्र निशेध करण्यात येत आहे. या घटनेच्या निषेधार्थशुक्रवार दि. १३/१२/२०२४ रोजी रांजणी शहरासह आठवडी बाजार देखील सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत बंद पुकारला आहे. या निवेदनावर रमण जाधव, कैलास जाधव, सिध्दार्थ जाधव, अरविंद जाधव आदींची नावे आहेत.

## फसल बिमा स्पताह अंतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

### ०१ ते ०७ डिसेंबरदरम्यान वेगवेगळे उपक्रम संपन्न



**आष्टी । रविंद्रनाथ गवळी/ ठाकुर**

भारतीय कृषी विमा कं.मार्फत आष्टी तालुक्यातील विविध गावांमध्ये ०१ ते ०७ डिसेंबर दरम्यान वेगवेळे उपक्रम राबविण्यात आले.


पिंप्री आष्टी येथे पीक विमा जनजागृतीच्या अनुषंगाने भारतीय कृषी विमा कं.मार्फत फसल बिमा पाठशाळेचे आयोजन केले होते. पीक विम्याबाबत जनजागृती करणे गरजेचे असुन हा उपक्रम त्याचाच एक भाग होता. सदरील कार्यक्रम जिल्हा व्यवस्थापक बाबासाहेब इनकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात पार पडला यावेळी तालुका प्रतिनिधी श्री.विनोद लोंढे आणि श्री.संजय पवार यांनी उपस्थित शेतकऱ्यांना पीकविम्याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले.

## गंगापूर येथे संस्था चालक तीन लाखाची लाच घेताना ए सी बी च्या ताब्यात

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

शाळेतील कर्मचाऱ्याचा पगार सुरू करण्यासाठी फादर विल्फ्रेड मार्टिन सलढाना यांना तीन लाख रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडल्याने खळबळ उडाली आहे.

सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार तिस वर्षिय तक्रारदार हे अनुकंपा तत्वावर संस्थेच्या शाळेत नोकरीस लागलेले असून त्यांचा पगार सुरू करण्यासाठी शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी प्रस्ताव तयार करून पाठवण्याकरिता ३०००००/(तीन लाख रुपये) लाचेची मागणी सेंट फ्रान्सिस डीसेल्स एज्युकेशन सोसायटी, छत्रपती संभाजीनगरचे सचीव फादर विल्फ्रेड मार्टिन सलढाना, वय ७५ वर्षे, रा. भारतरत्न मदर टेरेसा इंग्लिश स्कूल, गंगापूर यांनी १० आक्टोंबर रोजी मागणी केली होती. गुरुवार ,१२ डिसेंबर रोजी तक्रारदार यांनी पंच साक्षीदारा समक्ष तिन लाख रुपये लाच रक्कम सचिव कार्यालयात, भारतरत्न मदर टेरेसा इंग्लिश स्कूल, गंगापूर, ता. गंगापूर, जि, छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयात स्वीकारली असता त्यांना ताब्यात घेण्यात आले असून पो.स्टे गंगापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई ला.प्र.वि. चे पोलीस अधिक्षक संदीप आटोळे, अप्पर पोलिस अधिक्षक मुकुंद अघाव,पो. उप अधिक्षक सुरेश नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक अमोल धस, सहाय्यक अधिकारी- पोलीस निरीक्षक विजयमाला चव्हाण ,पोअंम युवराज हिवाळे, पोअंम जीवडे , सी. एन. बागुल आदींनी ही कारवाई केली.



## मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्तेच्या निषेधार्थ आष्टीत रास्ता रोको

**आष्टी । रविंद्रनाथ गवळी/ठाकुर**

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आला.या घटनेच्या निषेधार्थ आष्टी येथे संतप्त होत तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको करण्यात आला यावेळी आरोपीला शिक्षा झाली पाहिजे तात्काळ आरोपींना अटक करा अशी मागणी करण्यात आली नायब तहसीलदार बाळदत्त मोरे पोलिस निरीक्षक शरद भुतेकर यांनी निवेदन स्विकारल्यानंतर रस्ता रोको मागे घेण्यात आला

आष्टी तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने आष्टी शहरातील क्रांतीसुर्य महात्मा फुले चौक अहिल्यानगर बीड महामार्गावर रास्ता रोको दि.११ डिसेंबर रोजी करण्यात आला होता.यावेळी कुटुंबीयांना पोलिस संरक्षण दिले पाहिजे, सरपंच संतोष देशमुख यांचे सोमवारी अपहरण करून हत्या करण्यात आली.या घटनेमागचा मास्टर माईंड शोधला पाहिजे,गुन्हेगाराला शिक्षा झाली पाहिजे,खटला जलदगतीने न्यायालयात चालविण्यात यावा,सर्व आरोपींना शिक्षा झाली पाहिजे,सर्व मागण्यांचा लवकरात लवकर शासन दरबारी न्याय देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली.एक मराठा लाख मराठा,मनोज दादा आगे पढो अशा घोषणा देण्यात आल्या यावेळी सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे,सुनिल रेडेकर,अनिल ढोबळे,अशोक पोकळे,सुधिर पठाडे, अविनाश जगताप,सोमा तोडकर, संदीप चौधरी,राहुल जगताप,शरद केरुळकर मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



## संपादकीय..

# थाली बचाव!

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास म्हणतात की चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीच्या अखेरीस चलनवाढीचा वेग मंदावेल. छान. ही तिसरी तिमाही म्हणजे ऑक्टोबर ते डिसेंबर. म्हणजे सर्व सण–वार संपल्यावर महागाई कमी होईल. ज्या वेळी फारशी काही खरेदी करावयाची नसते त्या वेळी दर कमी होतील. हा युक्तिवाद त्यांनी व्याजदर कपातीच्या संदर्भात केला. चलनवाढीवर एक उतारा हा व्याजदर वाढीचा असतो. व्याजदर वाढले की पैशाचा पुरवठा कमी होतो आणि चलनवाढ टळते. अलीकडेच झालेल्या रिझर्व्ह बँकेच्या बैठकीत व्याजदर कपातीचा मुद्दा आला असता ती करण्याविरोधात बहुमताने निर्णय घेतला गेला. त्याआधी काही आठवड्यांपूर्वी विद्यमान सरकारातील काही विद्वानांनी महत्त्वाचे खाद्यपदार्थ घटक चलनवाढ निर्देशांक मापनातून वगळण्याची सूचना केली होती. या घटकांमुळे महागाई झाल्याचे दिसून येते, म्हणून त्यांस निर्देशांक मापनातून वगळावे अशी या अधिकाऱ्यांची मसलत. या सूचनेची तुलना महाराष्ट्रातील शिक्षण आराखड्यातील गणित या विषयासंदर्भातील निर्णयाशी करता येईल. शालेय विद्यार्थ्यांस जे विषय जड जातात, त्यात गणित अग्रक्रमावर. यात अनुत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाणही अधिक. ही अनुत्तीर्णांची संख्या कमी करण्यासाठी आपले राज्य सरकार उत्तीर्णतेची किमान गुणांची आवश्यकता ३५ वरून २० वर आणू पाहते. म्हणजे कमी विद्यार्थी अनुत्तीर्ण होतील, हा हिशेब. हा तर्कवाद पुढे नेल्यास काही सरकारी विद्वान; 'गणित हा विषय अभ्यासक्रमातून काढूनच टाका' असे सुचवणार नाहीतच असे नाही. म्हणजे गणितात कोणी अनुत्तीर्ण होण्याची शक्यताच नाही. तद्वत महागाई निर्देशांकातून दैनंदिन खाद्यापदार्थच काढून टाकले तर महागाईही नाहीशी होईल. याचा प्रतिवाद 'द हिंदु'ने नुकत्याच प्रकाशित केलेल्या विशेष लेखाने करता येईल.

कोणत्याही घरातील जेवणाच्या ताटातील किमान घटकांसाठी गेल्या वर्षी या काळात किती पैसे मोजावे लागले होते, आता या घटकांची किंमत काय आहे, गेल्या वर्षी या काळात सर्वसाधारण कामगारांचे वेतन काय होते, ते आता किती आहे या साध्या घटकांचा तपशील त्यांनी सादर केला आणि जेवणाच्या ताटातील घटकांची किंमतवाढ आणि सामान्यांसाठी झालेली–न झालेली वेतनवाढ यांच्याशी या घटकांची तुलना केली. खरे तर दैनंदिन अर्थशास्त्र समजून घेणे इतके सोपे आहे. यास गणप्याचे अर्थशास्त्र असे विद्वतजनांकडून हिणवले जात असले तरी गणप्यासही कळावे इतकी सुलभता या विद्वानांस आपल्या प्रतिपादनात आणता येत नाही. ती सुलभता आणणे हे पत्रकारितेचे खरे काम. 'द हिंदु'तील लेख हे करतो. चौरस आहारासाठी लागणाऱ्या घटकांतील दरवाढ यात मोजण्यात आली आहे. उदाहरणार्थ २५ ग्रॅम हिरव्या मिरच्या (दरवाढ २६.३ टक्के), २५ ग्रॅम लसूण (१२८ टक्के), पाव किलो टोमॅटो (२४७ टक्के), बटाटे (१८० टक्के), कांदे (५१.७ टक्के), कणीक (पाव किलो ३ टक्के), तांदूळ (अर्धापाव ०.७ टक्के घट), तूरडाळ (अर्धापाव २.६ टक्के घट) असे वेगवेगळे घटक यात विचारात घेतले गेले. गतसाली एका व्यक्तीच्या दोन वेळच्या जेवणाचा स्वयंपाक करण्यास लागणाऱ्या जिन्नसांसाठी १०१.८ रु मोजावे लागत. यंदा तेव्हढ्याच जेवणासाठी त्याच घटकांसाठी खर्च करावी लागणारी रक्कम १५४.४ रु इतकी आहे. गतसाली एका व्यक्तीच्या महिनाभराच्या दोन वेळच्या जेवणासाठी ३,०५३ रु लागत. आज हीच रक्कम ४,६३१ रु. इतकी आहे. आणि हे सर्व फक्त शाकाहारींसाठी. यात इंधनाचे खर्च धरण्यात आलेले नाहीत. ही मांडणी फक्त खाद्यान्नांसाठीच्या जिन्नसांच्या मूल्याबाबत आहे. याचा अर्थ एका व्यक्तीच्या दोन जेवणांच्या खर्चासाठीच्या रकमेत गेल्या १२ महिन्यांत तब्बल ५२ टक्के इतकी वाढ झाली. याची दखल का घ्यावयाची? प्रमुख कारणे तीन.पहिले म्हणजे ही सर्व पाहणी महाराष्ट्रवासींचे जीवनमान गृहीत धरून करण्यात आलेली आहे. यातील सर्व घटकांचे या राज्यातील दर फक्त यात विचारात घेण्यात आलेले आहेत. टोमॅटो, बटाटा, कांदा यांच्या दरांत झालेली दरवाढ सामान्यांचे डोळे पांढरे करणारी आहे. ती किती आहे याचा तपशील वर आहेच. तथापि या खेरीज घराघरांतील जेवणांत वापरल्या जाणाऱ्या साध्या साध्या भाज्यांच्या दरांतही सरासरी ८९ टक्के इतकी दरवाढ गेल्या फक्त १२ महिन्यांत झाली. तिचा विचार करण्याचे आणखी एक कारण म्हणजे याच काळात झालेली वेतनवाढ. ती सरासरी ९ ते १० टक्के इतकीच आहे. याचा अर्थ उत्पन्न, एकंदर चलनवाढ आणि दोन जेवणांस आवश्यक किमान वस्तूच्या दरांत झालेली दरवाढ यांचा कसलाही ताळमेळ नाही. म्हणजेच सामान्यांस हातातोंडाशी गाठ घालणे दिवसागणिक जिकिरीचे होऊ लागलेले आहे. यातील सामाजिक अंगही तितकेच महत्त्वाचे. म्हणजे हे सर्व सरासरी झाले. सरासरी ही बव्हंश: आकर्षक आणि सुखावणारी असू शकते. पण समाजात असमान जगणे वाट्यास आलेले घटकही महत्त्वाचे असतात. म्हणजे एकल माता, अनाथाश्रमातील जगणे वाट्यास आलेले, तितकेही नशिबात नाही असे बेघर, रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेल्यांची घरे आदी मुद्दे विचारांत घेतल्यास अशांचे जगणे अधिकच महाग झाले असणार, हे उघड आहे. खेरीज स्त्री–पुरुष भेद यातही आहे. म्हणजे रोजगारावरील पुरुष मजुरांच्या वेतनात होणारी वाढ आणि महिला मजुरांचा रोजगार यात तफावत असते. त्यामुळे महिलांच्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या घरांसमोर अधिक मोठे आव्हान उभे राहते. हे वास्तव गंभीर असे.आणि या वास्तवाचे कसलेही प्रतिबिंब याच राज्याचे भवितव्य ठरवण्यासाठी होत असलेल्या निवडणुकांत नाही, हे याचा विचार का करायचा याचे तिसरे कारण. राजकारण असे सामान्यांच्या जगण्यापासून इतके तुटलेले कधीही नव्हते. जनसामान्य आणि निवडणुकांच्या रिंगणात उतरलेले यांचा काडीचाही संबंध नाही, असेही महाराष्ट्रात इतक्या प्रमाणावर कधी घडलेले नव्हते. यात कळीचा आणि तितकाच वेदनादायी मुद्दा आहे तो या वास्तवास झाकून ठेवण्याच्या राजकारण्यांच्या प्रयत्नांत–त्यातही अधिक सत्ताधाऱ्यांस–येत असलेले यश. राज्यातील जाती/प्रजाती/पोटजाती/उपजाती असे अधिकाधिक भेद करावेत, या लहान लहान गटाच्या त्याहूनही लहान नेत्यांस जवळ करावे, आंजारून–गोंजारून, योग्य ते दाम मोजून त्याचा गंड आणि कंड शमवावा आणि त्या बदल्यात त्या लहानग्या नेत्याने आपल्या 'समाजा'चा पाठिंबा हे सर्व करणाऱ्यांस जाहीर करावा, हेच सध्या सुरू आहे. वास्तवात बेरोजगार दलित असो वा मराठा. त्याच्या वेदना सारख्याच असतात. परंतु आर्थिकदृष्ट्या सबळ वर्गातील समाजाची प्रतिकूल परिस्थितीस तोंड देण्याची क्षमता नेहमीच अधिक असते.म्हणजे सर्व गाडा खरे तर आर्थिक मुद्द्यावर येऊन थांबायला हवे. पण तसे करावयाचे तर हिशेब द्यावा लागणार. त्यापेक्षा सामाजिक गंडास फुंकर घालणे सोपे. त्यामुळे मूठभरांचा अहं सुखावतो आणि त्यावरच ही मंडळी समाधान मानून शांत होतात. पण त्यामुळे ना प्रश्नाचा आकार बदलतो ना त्यांची संख्या कमी होते. या साध्या वास्तवाकडे राज्यातील जनसामान्यांची डोळेझाक होत आहे हे दुर्दैव. ते विद्यामान निवडणुकांत पुरेपूर दिसते. सर्वच क्षेत्रातील महाराष्ट्राची पीछेहाट या मंडळींच्या गावीही नाही. म्हणून या मंडळींच्या इच्छेवर 'ताली बजाव' वादनात सहभागी न होता आपल्या जेवणाच्या 'थाली बचाव'चा विचार अधिक व्हायला हवा. तितका सुज्ञ महाराष्ट्रातील मतदार आहे का या प्रश्नाच्या उत्तरात निवडणुकीचे भवितव्य आहे.

# मध्यमवर्ग मेला तरी



अलीकडे 'लोकसत्ता'ने अर्थव्यवस्थेतील ताणतणावांबाबत वरचेवर लिहिले. ते वाचून वास्तवाकडे डोळेझाक करण्याची सवय लागलेल्या सुखासीन जल्पकांचा जळफळाट होणे साहजिक. अशा वेळी हे जल्पकजग शहामृगाप्रमाणे वाळूत माना खुपसून तरी बसते किंवा सत्यकथन करणाऱ्यावर हेत्वारोप तरी करते. तथापि विविध वित्तसंस्थांनी प्रत्यक्षपणे आणि साक्षात रिझर्व्ह बँकेनेच अप्रत्यक्षपणे 'लोकसत्ता'च्या भूमिकेस दुजोरा दिला असून सध्याच्या सणासुदीच्या हंगामातही महत्त्वाच्या चीजवस्तूंना उठाव कसा नाही, याचा तपशील प्रसृत केला आहे. जपानच्या 'नोमुरा'सारख्या बलाढ्य वित्तसंस्थेच्या मते चक्र जसे एकदा वर गेल्यानंतर खाली येते तसे भारतीय अर्थव्यवस्थेचे आता झाले आहे. त्याचा अर्थ मागणी मंदावत असून अर्थव्यवस्थेच्या विविध अंगांस या मंदावलेल्या अर्थव्यवस्थेचा चिमटा बसताना दिसतो. हे इतकेच असते तर नैमित्तिक चक्रनेमिक्रमेपण म्हणून त्याकडे दुर्लक्ष करता आले असते. पण ते तसे नाही. या मंदावत्या अर्थव्यवस्थेत दोन दुभंग दिसतात. त्या दोन दुभंगांवर भाष्य करण्याआधी अर्थव्यवस्था मंदावल्याचे दर्शवणाऱ्या लक्षणांवर भाष्य.मोटार उद्योग हा अर्थव्यवस्थेचा एक मोठा निदर्शक. मोटारीच्या निर्मितीत पोलाद, काच, ॲल्युमिनियम, विजेऱ्या, रबर, इंधन, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि मोठ्या प्रमाणावर कुशल कामगार यांचा सहभाग असतो. त्यामुळे हे एक क्षेत्र समग्र अर्थव्यवस्थेस आपल्या खांद्यावर तोलून नेते. तथापि सद्या:स्थितीत याच क्षेत्राने गती हरवल्याचे दिसते. त्यातही फरक असा की अत्यंत श्रीमंत, महागड्या, केवळ धनिकांनाच परवडतील अशा आलिशान मोटारींची विक्री जोमात आहे आणि त्याच वेळी १० लाख रुपयांच्या आतील लहानग्या, मध्यमवर्गीयांसाठी पहिलटकरीण असलेल्या मोटारींस मात्र तितकी मागणी नाही. म्हणजे धनिकांच्या खिशातील छनछन पूर्वी होती तशीच आहे. परंतु मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय यांच्या खिशास बसणारा मात्र आर्थिक ताण या काळात लक्षणीयरीत्या वाढल्याचे दिसते. मारुती सुझुकीचे अध्यक्ष, भारतीय मोटार उद्योगाचे ज्येष्ठ भाष्यकार आर. सी. भार्गव यांनी नुकतेच हे वास्तव बोलून दाखवले. हे विमानातील बिझनेस क्लास आणि सर्वसाधारण प्रवाशांचा वर्ग यांतील वर्गवारीसारखे झाले. म्हणजे विमान कंपन्यांसाठी बिझनेस क्लास महत्त्वाचा असला तरी त्यांना नफा होत असतो तो सर्वसाधारण प्रवाशांतून. त्यांची संख्या मोठी असते. तसे श्रीमंती गाड्या या कंपन्यांस ब्रँडिंगसाठी महत्त्वाच्या असल्या तरी या उद्योगाची चूल प्रचंड प्रमाणावर विकल्या जाणाऱ्या लहान गाड्यांवर पेटत असते. सध्या हाच लहान गाड्यांचा विक्री ओघ आटल्याचे दिसते. तेव्हा या उद्योगाची चिंता रास्तच. हा दुभंग इतक्या एका घटकापुरताच मर्यादित नाही.त्यास ग्रामीण आणि शहरी अशी आणखी एक किनार आहे. म्हणजे अनेक घटकांची शहराशहरांतील मागणी मंदावत असून त्याच वेळी अर्थव्यवस्थेची धुगधुगी ही ग्रामीण भारतात टिकून असल्याचे आकडेवारीवरून दिसते. शहरी भागात या तिमाहीत लहान मोटारींच्या विक्रीचा वेग शून्याखाली २.३० टक्के इतका नोंदला गेला तर त्याच वेळी ग्रामीण भारतात मात्र या मोटारींच्या विक्रीत १.९० टक्के इतकी वाढ नोंदली गेली. गतसाली सेमीकंडक्टर्सच्या अनुपलब्धतेचा फटका मोटार उद्योगास बसला. या वेळी असे काहीही कारण नव्हते. त्यामुळे वाहन उद्योग दिवाळी आणि या सणासुदीच्या काळाकडे डोळे लावून बसलेला होता. पण त्याची निराशा झाली. या काळात ग्रामीण भागातील मागणीत काहीशी वाढ आहे हे खरे. पण ती शहरी मागणीतील मंदावस्था भरून काढणारी नाही. या मोटार उद्योगाच्या जोडीला 'फास्ट मूव्हिंग कन्झ्युमर गुड्स' (एफएमसीजी) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गृहोपयोगी वस्तूंची विक्रीही मंदावली. बिस्किटे, शीतपेयांपासून ते सौंदर्यप्रसाधनांपर्यंत अनेक घटकांचा समावेश यात होतो. या वस्तू दुकानांच्या फडताळांतून भराभर विकल्या जातात म्हणून त्या एफएमसीजी. पण या वस्तूंची विक्रीही सध्या मंदावल्याचे दिसते. या मंदगतीबाबत नेस्टले, पेप्सिको, युनिलिव्हर, कोकाकोला, लॉरिआल आदी अनेक कंपन्यांनी विविध माध्यमांतून अलीकडेच चिंता व्यक्त केली. याबाबतही आवर्जून लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे ग्रामीण आणि शहरी अशी दरी. खरे तर या चंगळवादी वस्तूंस शहरांत उठाव अधिक. पण सद्या:स्थितीत त्यांस अधिक मागणी आहे ती शहरांपेक्षा खेड्यात. म्हणजे मोबाइलचा 'डेटापॅक' अधिकाधिक वापरणारे हे जसे खेड्यांत अधिक आढळू लागले आहेत त्याप्रमाणे या चंगळवस्तूंचा उठावही शहरेतर ठिकाणांहून अधिक वाढला आहे. पण यातही मोटारींबाबत दिसते ते सत्य दिसून येते. शहरी मागणीच्या गळतीस ग्रामीण मागणी हा उतारा असू शकत नाही. हा झाला तपशील. आता यामागील कारणांबाबत.

हे कारण म्हणजे शहरांतून लपून राहणारी गरिबी. ग्रामीण भारतातील गरिबीची सार्वत्रिक दखल घेतली जाते. तिचे मोजमापही रीतसर केले जाते आणि त्यासाठीच्या संख्याशास्त्रीय पद्धतीही विकसित आहेत. परंतु शहरी गरिबीचे तसे नाही. एकतर झगमगाटामुळे शहरी गरीबही उपेक्षित राहतात. त्यामुळे त्यांच्याकडे नेहमीच धोरणकर्त्यांचे दुर्लक्ष होते. त्यात या शहरी गरिबांसाठी कोणत्याही कल्याणकारी योजना नसतात आणि त्या कशा आखायच्या याचे तंत्रही तितके विकसित नाही. त्यामुळे शहरी गरीब तसा उपेक्षित. वास्तविक खेड्यातील गरिबापेक्षा शहरी गरिबासमोर चलनवाढीचे आव्हान अधिक मोठे असते. पण या गरिबीस हाताळायचे कसे याचे उत्तर धोरणकर्त्यांकडे नाही. आता ते शोधावे लागेल. याचे कारण ऐतिहासिकदृष्ट्या शहरे ही अर्थगतीची इंजिने असतात. त्यातून मागणी मंदावणे देशास परवडणारे नाही. खेड्यांतील अर्थस्थितीत नैसर्गिक कारणांनी सहज बदल होऊ शकतो. एखादा पावसाळा बिघडला तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चित्रच बदलून जाऊ शकते. त्या तुलनेत शहरी अर्थव्यवस्था अधिक स्थिर आणि अधिक काटक असते. त्यामुळे शहरांस गती हरवून चालत नाही. तसे झाल्यास अर्थव्यवस्थेसमोर गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो.आपण अद्याप त्या अवस्थेस गेलेलो नाही. पण तरीही हे शहरांचे मंदावणे धोरणकर्त्यांस आणि उद्योगांस चिंताजनक वाटते यावरून या मंदगतीचे गांभीर्य लक्षात यावे. या शहरी मंदगतीतही परत एक उपकथानक आहे. ते म्हणजे मुंबई, दिल्ली, बेंगलोर आदी शहरांतील मागणीची गती पूर्वीसारखीच धट्टीकट्टी आहे. आव्हान आहे ते नवशहरांचे. आज देशात अशी अनेक नवशहरे उदयास आलेली आहेत. 'टियर १', 'टियर २' अशी त्यांची वर्गवारी होते. सर्वच राज्यांत या अशा नवशहरांची वाढ दिसून येते. देशातील मूळ महानगरे आपला अर्थविकास कायम राखत असताना या नवशहरांतील मागणीत मात्र लक्षणीय घट दिसून येते. ही बाब निश्चितच काळजी वाढवणारी. याचे कारण चार महानगरांच्या हातांस हात लावणाऱ्या या नवमहानगरांचा वाटा अर्थव्यवस्थेत मोठा आहे. त्यातच घट होत असल्यास एकंदर अर्थव्यवस्थेवरच त्याचा परिणाम होण्याचा धोका संभवतो.या संख्याशास्त्रीय वास्तवापलीकडेही एक मोठा अर्थ या आकडेवारीत दडलेला आहे. ही नवशहरे, देशातील अर्धग्रामीण–अर्धनागर प्रदेश यांत ठासून भरलेला आणि जोमाने वाढणारा नवमध्यमवर्ग हा देशाच्या अर्थगतीचे चाक आहे. या मध्यमवर्गाने हात आखडता घेतल्यास हे चक्र मंदावते. काही परदेशी वित्तसंस्था भारतीय मध्यमवर्गाच्या अंताची भाषा करताना दिसतात. हे खरे असेल तर भीतीदायक म्हणावे लागेल. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनकाळात सेनापती बापटांचे 'महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले' हे गीत चांगलेच लोकप्रिय होते. त्यातील 'महाराष्ट्र'ऐवजी मध्यमवर्ग हा शब्द घातल्यास ते अधिक रास्त ठरेल.

# अवघा हलकल्लोळ करावा



अलीकडच्या काळात दुकाने, विक्रीतंत्र आदींत उत्कृष्ट बदल आणि सुधारणा झाल्या असल्याने ग्राहकांस पर्याय मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. त्यात मोबाइलच्या माध्यमातून घरपोच वस्तू पोहोचवणाऱ्यांच्या सेवाही आकारास आल्याने ग्राहकांची चांगलीच चंगळ असते. वस्तू मिळत नाही, असे नाही. 'झेप्टो'वर नसेल तर 'ब्लिंकइट' आहे. ते नसेल तर 'इन्स्टामार्ट' आहे. ते नसेल तर स्विगी आहे. फ्लिपकार्ट आहे. आणि 'जगी ज्यास कोणी नाही' या उक्तीप्रमाणे त्यास शेवटी ॲमेझॉन आहेच आहे. हे पर्याय इतके आहेत की खरेदीची हौस अपूर्ण राहणे अंमळ अशक्य. विक्रीकलेतील या पर्यायांच्या संख्येमुळे अलीकडे दुकानदारही अधिक स्पर्धाभिमुख झालेले आहेत. म्हणजे एखादी चीजवस्तू स्वत:च्या दुकानात नसली तरी ते ग्राहकांचा हिरमोड होऊ देत नाहीत. शेजारच्या वा पलीकडील आपल्या व्यवसाय–बंधूकडून ते ती स्वत: आणून देतात. या बाजारपेठीय व्यवहाराची चर्चा करण्यामागील प्रयोजन म्हणजे आपले विद्यामान राजकीय वातावरण. त्याकडे डोळसपणे पाहणाऱ्या चाणाक्षांस बाजारपेठीय उलाढाल आणि हे निवडणूकपूर्व राजकीय वातावरण यातील साधर्म्य एव्हाना लक्षात आले असेल. आपल्या बाजारपेठीय बदलांचे स्पष्ट प्रतिबिंब विद्यामान राजकारणात ठसठशीतपणे दिसते. ज्यांस ते आढळले नसेल त्यांच्यासाठी पुढील काही मुद्दे.

जसे की 'हे' दुकान नाही तर 'ते', 'ते' नाही तर पलीकडचे असे ज्याप्रमाणे ग्राहक करतो त्याचप्रमाणे सध्या निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांचे वर्तन नव्हे काय? हा पक्ष उमेदवारी देत नाही काय? हरकत नाही. तो आहे. तोही नाही म्हणतो? तरीही हरकत नाही. आणखी एक आहे. त्याच्याकडूनही नकार असेल तर तिसरा पक्ष आहे. नाहीतर चौथा, पाचवा इत्यादी. असे असल्यामुळे कोणत्या ना कोणत्या दुकानात ग्राहकांस हवी ती चीज जशी मिळते त्या प्रमाणे निवडणूक इच्छुकांस कोणता ना कोणता पक्ष आपला म्हणतोच म्हणतो. आणि एखादा उमेदवार सर्व पक्षांनाच समजा टाकाऊ वाटला तरी अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची सोय त्यास आहेच. म्हणजे ज्याप्रमाणे कोणत्याही दुकानात ठेवण्याच्या लायकीचा नसलेला माल जसा रस्त्यावर विकायची सोय आहे, तसेच हे नव्हे काय? अलीकडे युतीच्या राजकारणाचे दिवस आहेत. महाभारतात कुंती पांडवांस एक तीळ सात जणांत वाटून खाण्याचा सल्ला देते. त्यावेळी पांडवांनी तो पाळलाच. परंतु त्या सल्ल्याचे पालन लोकशाहीच्या महाभारतातील विद्यामान पक्षपांडवही करतात. त्यामुळेच ते प्रत्येक मतदारसंघ सात–सात जणांत वाटून घेताना दिसतात. भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजितदादांची राष्ट्रवादी, राहुल गांधी यांची काँग्रेस, शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना हे सहा पक्ष आणि परिस्थितीजन्य गरजेनुसार कधी मनसे, कधी वंचित तर कधी अपक्ष यांतील एक असे मिळून सात. विद्यामान लोकशाही महाभारताचे वैशिष्ट्य म्हणजे हा एक तीळ सात जणांत वाटून घेण्याचा सल्ला पांडवांप्रमाणे कौरवही पाळतात. तसेच बाजारपेठेत दुकानदार ज्या प्रमाणे आपल्या दुकानात एखादी चीजवस्तू नसेल तर मित्रविक्रेत्याच्या दुकानातून ती आणून देतो त्याप्रमाणे सध्या युतीधर्मानुसार एखादा मतदारसंघ व्यवसाय भागीदाराच्या वाट्यास गेला असेल तर आपला उमेदवार दुसऱ्या पक्षात वा दुसरा उमेदवार आपल्या पक्षात विलीन करून घेण्याची सोय आहे. म्हणजे एखाद्याकडे मतदारसंघ आहे; पण उमेदवार नाही तर मित्रव्यवसायी त्यास उमेदवार भाड्याने देतो. हे उलटही घडण्याची सोय आहे. म्हणजे उमेदवार आहे पण मतदारसंघ नसेल तर तोही मिळण्याची सोय सध्या आहे. एखाद्याकडे मतदारसंघही नाही, उमेदवारही नाही आणि लढण्यास आवश्यक साधनसामग्रीही नाही अशांस; बाजारपेठेत ज्या प्रमाणे 'नो कॉस्ट ईएमआय'वर हवे ते घेता येते; तसे हवे ते मिळण्याची सोयही सध्याच्या राजकारणात आहे. बाजारपेठ आणि विद्यामान राजकीय वास्तव यांच्यातील इतकी तद्रुपता निश्चितच कौतुकास्पद म्हणायला हवी. हे झाले विक्रेत्यांबाबत. आता खरेदीदारांविषयी.म्हणजे मतदार म्हणवून घेणाऱ्यांविषयी. राजकारण्यांनी जसा बदलत्या बाजारपेठेकडून धडा घेतला तसे स्वत:तील परिवर्तन आणि तसेच प्रबोधन मतदारांनीही करायला हवे. अलीकडे खरेदीदाराची ज्या प्रमाणे स्विगी, झोमॅटो, ब्लिंकइट आदीत काहीही भावनिक गुंतवणूक नसते त्या प्रमाणे मतदारांनी स्वत:ची राजकीय पक्षांतील गुंतवणूक कमी करायला हवी. हा नाही तर तो. नाहीतरी हल्ली किराणा दुकानांप्रमाणे एका दुकानातील माल दुसऱ्या दुकानांतही असतो. त्याच प्रमाणे राजकीय पक्षांचेही नाही काय? आज या पक्षात आहे म्हणावे तर तो उद्या दुसऱ्या पक्षात दिसतो आणि परवा तिसऱ्यात आणि पुढच्या आठवड्यात परत पहिल्यात. त्यामुळे अमुक एक चीज/वस्तू जशी एकाच दुकानदारापुरती मक्तेदारी नसते तद्वत अमुक एखादी व्यक्ती/नेता ही एकाच राजकीय पक्षाची मक्तेदारी बऱ्याचदा नसते. एका दुकानातला माल दुसऱ्या दुकानात ज्या प्रमाणे उपलब्ध असतो त्या प्रमाणे एका पक्षाचा नेता दुसऱ्या पक्षातर्फे सहज निवडणुकीस उभा केला जाऊ शकतो. आतापर्यंत असलेली ही दुकाना–दुकानांमधली भिंत ज्या प्रमाणे नवीन तंत्रज्ञानाने पाडून टाकली त्याप्रमाणे राजकीय पक्षा–पक्षांमधील दरी या विधानसभा निवडणुकीने भरून काढली असे म्हणता येईल. म्हणून महाराष्ट्रातील विद्यामान निवडणुका न भूतो न भविष्यती अशा ठरतात. राजकारणाचे वर्णन काही अभिजन 'दुकानदारी' या शब्दात करत. ते शंभर टक्के या निवडणुकीत खरे ठरताना दिसते. याचा अर्थ असा की राजकीय पक्षांचे वर्तन जर दुकानदारांप्रमाणे होत असेल तर त्याचा अर्थ असा की मतदारांसही ग्राहकाप्रमाणेच वागावे लागेल. त्यास इलाज नाही.म्हणजे पक्षीय, विचारधारा इत्यादी निष्ठा, बांधिलकी या संकल्पनांस या निवडणुकांत कायमची मूठमाती द्यायला हवी. नागरिकांनी आपल्या वैचारिक निष्ठा या मंडळींशी बांधून ठेवाव्यात इतकी यांची औकात नाही. निवडणुका आणि राजकारण हा व्यवहार हा अलीकडच्या काळात शुद्ध बाजारपेठीय झालेला आहे. बाजारपेठेशी नाते हे देवाण–घेवाणीचे असते. त्यात भावनिक गुंता नसतो. त्याप्रमाणे मतदारांस राजकीय पक्ष, नेते यांच्याशी आपले नाते नव्याने बेतावे लागेल. एका दुकानात बराच काळ न 'विकला' गेलेला माल ज्या प्रमाणे नंतर भंगारात काढला जातो त्या प्रमाणे अलीकडच्या काळात एकाच पक्षाशी निष्ठा बाळगणाऱ्या नेत्यांचे झाले आहे आणि हा कालानुरूप बदल केला नाही तर तेच मतदारांचेही होणार आहे. सर्वच पक्षातील निष्ठावान आज भंगारात निघाल्यासारखे आहेत. त्यांना ना स्वत:च्या पक्षात मान म्हणून ना दुसऱ्या पक्षाचे निमंत्रण. ही राजकीय अवस्था मतदारांचीही झालेली आहे. एकाच एक पक्षाशी स्वत:चे मत बांधून ठेवणाऱ्या मतदारांची जितकी प्रतारणा आणि विटंबना सध्या होते तितकी या आधी इतक्या वर्षात कधी झाली नसेल. म्हणूनच सध्याच्या वातावरणात मतदार–राजकीय पक्ष हे नाते ग्राहक–दुकानदार या प्रमाणे बदलले जाण्याची गरज अधोरेखित होते. एकेकाळी एकच एक किराणा माल विक्रेत्याकडून महिन्याच्या महिन्यास यादी टाकून वाणसामान घेणारी पिढी जशी कालबाह्य झाली त्याचप्रमाणे एकाच एक पक्षाशी आपल्या निष्ठा वाहणाऱ्या मतदारांतही बदल व्हायला हवा.तात्पर्य बाजारपेठेप्रमाणे सध्या राजकारणातही नुसता कोलाहल माजला असून तेथे बाजारपेठेप्रमाणेच नुसती बेशिस्त, अनागोंदी आणि असह्य कलकल भरून राहिलेला आहे. अशावेळी मतदारांनीही कालबाह्य पक्षनिष्ठेपेक्षा उमेदवार पहावा आणि स्वत:च अवघा हलकल्लोळ करावा. लोकशाही वाचवण्यासाठी हा मतदारांचा निष्ठात्याग आवश्यक आहे.

# परभणीतील घटनेचा नगर शहरात आंबेडकरी समाजाच्या वतीने निषेध व्यक्त करून निदर्शन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

परभणी शहरामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर ठेवण्यात आलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची एका अज्ञाताने मंगळवारी सायंकाळी तोडफोड करून विटंबना केल्यामुळे समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने निषेध नोंदवून मार्केटयार्ड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निदर्शन करण्यात आली यावेळी आंबेडकरी समाजाचे ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुरेश बनसोडे, अजय साळवे, सुमेध गायकवाड, सुनील साळवे, सुनील शिंदे, किरण दाभाडे, महेश भोसले, अमित काळे, संजय जगताप, दीपक लोंढे, अमर निर्भवणे, विजय गायकवाड, सागर ठोकळ, हरीश आल्हाट, संदीप वाकचौरे, दया गजभिये, नवीन भिंगारदिवे, लखन सरोदे, संतोष पाडळे, विशाल गायकवाड, विनोद भिंगारदिवे, विशाल भिंगारदिवे, कौशल गायकवाड, शोभा गाडे ,सारंग पटेकर, संघराज गायकवाड, संजय भिंगारदिवे, सोनू पाटोळे, सुजित घंगाळे, ऋषिकेश पाडळे, अजय बडोदे, नितीन कसबेकर, समीर भिंगारदिवे, येसुदास वाघमारे, प्रकाश कांबळे, शांतवन साळवे, जुनेद शेख, प्रा.भिमराव पगारे, पप्पू पाटील, सतीश साळवे, दीपक सरोदे, अविनाश भोसले आदीसह आंबेडकर समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

पुढे राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे सुरेश बनसोडे म्हणाले की, परभणी येथे घडलेल्या घटनेचा सर्व आंबेडकरी समाजाच्या वतीने व पक्ष संघटनेच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला तसेच बांगलादेशातील बौद्ध भिक्कु यांच्यावरील हल्ल्याचे देखील निषेध करण्यात आले व जो परभणी येथे घडलेल्या घटनेचा निषेध व्यक्त करत आरोपीला तात्काळ अटक करून देशद्रोहचा गुन्हा दाखल करून लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच सर्व आंबेडकरी समाजाच्या वतीने महाराष्ट्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी कायमस्वरूपी एक पोलीस नेमण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.



## भूजल सर्वेक्षणचे आयुक्ताची जिल्ह्याला भेट,अण्णा हजारे व पोपट राव पवार यांची भेट व घेतला विविध योजनांचा आढावा





**कर्जत । प्रतीनिधी**

आयुक्त, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, संचालनालय, पुणे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात भेट देऊन आदर्श गाव राळेगण सिद्धी आणि हिवरे बाजार या गावांची सदिच्छा भेट घेतली व विविध योजनांचा आढावा ही घेतला.

आयुक्त डॉ. भालचंद्र चव्हाण यांनी आदर्शगाव राळेगण सिद्धी व हिवरे बाजार येथे सदिच्छा भेट देऊन पद्मभूषण आण्णा हजारे व पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांची भेट घेतली. यावेळी आयुक्त यांनी आण्णा हजारे यांना भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या बाबत सुरू असलेल्या योजनांबाबत माहिती दिली. आण्णा हजारे यांनी भू. स. वि. यंत्रणेचे कौतुक करून, सगळ्यात जास्त माझ्या आवडीचा विभाग असल्याचे गौरवोद्गार काढले. तसेच डॉ.पोपटराव पवार यांनी हिवरे बाजार आदर्श गाव कसे घडवले व त्याची पार्श्वभूमी याबद्दल सविस्तर माहिती दिली.

यानंतर आयुक्त यांनी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा कार्यालय अहिल्यानगर येथे भेट देऊन अटल भूजल योजना, जलजीवन मिशन, पाणी गुणवत्ता प्रयोगशाळा च्या अनुषंगाने आढावा बैठक घेतली. माहिती शिक्षण संवाद उपक्रमाअंतर्गत भूजल माहिती प्रसारण केंद्र व भूजल समृद्ध ग्राम स्पर्धा याचा आढावा घेऊन कार्यपूर्तते बाबत सूचना दिल्या.

यावेळी संचालनालय भू.स.वि.यं.पुणे चे सहसंचालक तथा अटल भूजल योजनेचे राज्य प्रकल्प समन्वयक, डॉ. प्रवीण कथने, वरिष्ठ भूवैज्ञानिक तथा नोडल अधिकारी अटल भूजल योजना ऋषिराज गोसकी, नाशिक विभागाचे प्रादेशिक उपसंचालक श्रीमती अनुपमा पाटील तसेच भू. स. वि. यं. अहिल्यानगर कार्यालयाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक संतोष गावडे, नोडल अधिकारी राजेश दिक्षित यावेळी उपस्थित होते. तसेच कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी वर्ग, जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, जिल्हा अंमलबजावणी भागीदार संस्था सर्व विषय तज्ञ व समन्वयक तसेच पाणी गुणवत्ता प्रयोगशाळेतील रसायनी अनुजैविक तज्ञ इत्यादी उपस्थित होते. शेवटी माहिती शिक्षण संवाद तज्ञ गणेश पवार यांनी आभार मानले.

## रिपब्लिकन सेना लोहा तर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाच्या पुतळ्याच्या विटंबनेसंदर्भात मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर



**लोहा । प्रतिनिधी**

लोहा(ता.प्र)महामानव,क्रांतीसुर्य,भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू,रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशान्वये व समाजभूषण काकासाहेब खंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली परभणीतील झालेल्या विटंबनेच्या निषेधार्थ लोहा तहसिलदार विठ्ठल परळीकर व लोहा पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक नागनाथ आयलाने यांच्यामार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.सदर विटंबना करणारा जातीवादी समाजकंटक सोपान पवार याने केलेल्या घृणास्पद कृत्याप्रकरणी देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून असे नीच कृत्य त्याच्याकडून करवून घेणाऱ्या त्याला पाठीशी घालणाऱ्याचा शोध पोलीस प्रशासनाकडून लवकरात लवकर घ्यावा.या व इतर प्रमुख मागण्या सदर निवेदनात देण्यात आल्या. सदर मागण्या पूर्ण न झाल्यास येत्या काही दिवसात रिपब्लिकन सेनेतर्फे तीव्र आंदोलन छेडण्याचा जाहीर इशारा सदर निवेदनात देण्यात आला आहे.या निवेदनावर आंबेडकरी चळवळीचे नेते बालाजी खिल्लारे,रिपब्लिकन सेनेचे मराठवाडा उपाध्यक्ष अनिलदादा गायकवाड,पत्रकार प्रदीप कांबळे सामाजिक कार्येकर्ते नवनाथ आढाव,नगरसेवक केतन खिल्लारे,सचिन आढाव,रवी लोणे,गिरीष भालेराव, काकासाहेब लोहकरे,गणेश दाढेल आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचार त्वरित थांबववेत

### नगर तालुक्यातील सकल हिंदू समाज आक्रमक

## चिचोंडी पाटील येथे ग्रामप्रदक्षिणा पुर्ण करून हिंदू समाजाने नोंदविला निषेध





**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

बांगलादेशातील हिंदू बांधवांवर भगिनींवर तसेच बालकांवर होणारे अत्याचार या घटना माणुसकीला काळीमा फासणाऱ्या आहेत.यामुळे हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत.बांगलादेशातील हिंदू हे आमचे बांधव आहेत.जिहादी प्रवृत्तीच्या समाजकंटकांनी जे अमानवीय कृत्य केले आहे.याचा सर्व हिंदू समाज निषेध करीत आहे. बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचार त्वरित थांबवावेत अन्यथा हिंदू समाज आक्रमक होईल.असे प्रतिपादन तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज यांनी केले आहे.

बांगलादेशातील हिंदूवर होणाऱ्या अत्याचारा विरोधात नगर तालुका व चिचोंडी पाटील येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने चिचोंडी पाटील येथे गणपती मंदिरापासून ग्राम प्रदक्षिणा पूर्ण करून हिंदू समाजाने निषेध नोंदविला आहे.याप्रसंगी तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज,ह भ प नरोडे महाराज,हभप काळे महाराज,हभप स्वप्निल महाराज पवार,हभप उज्वलाताई ठोंबरे,रा.स्व.संघाचे सचिन राऊत आदींसह नगर तालुका व चिचोंडी पाटील पंचक्रोशीतील विविध हिंदुत्ववादी संघटना व सकल हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

याप्रसंगी सचिन राऊत म्हणाले,ज्या देशानी आपल्याला वंदे मातरम दिले त्याच देशात आज हिंदूवर अत्याचार होत आहेत.आपल्या घरातील एक ना एक व्यक्ती हा कुठल्या ना कुठल्या हिंदू संघटनेला जोडलेला असावा.असे आवाहन त्यांनी हिंदू समाजाला केले.हभप काळे महाराजांनी गोमातेला राजमातेचा दर्जा मिळाला आहे.देशातील गो हत्या थांबवावी.असे आवाहन त्यांनी केले आहे.स्वामी रामा**दैनिक** नंदजी पुरी महाराज (सालेवडगाव)यांनी विश्वशांती ची प्रार्थना केली. नरोडे महाराज यांनी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता केली.चौकट-सरकारने तात्काळ कार्यवाही बांगलादेश मधील हिंदूना संरक्षण द्यावे. इस्कॉनचे संन्यासी चिन्मय कृष्णादास यांची सुटका करावी.वक्फ बोर्ड कायदा कायमचा रद्द करावा.यासाठी प्रयत्न करावेत.गोहत्या थांबवावी

वरील मागण्या पूर्ण नाही झाल्यास सकल हिंदू समाजाच्या आक्रोशाला व रोषाला सरकारला सामोरे जावे लागेल.असा इशारा सकल हिंदू समाजाच्या वतीने देण्यात आला आहे.

## साकोलीतील अभिकर्त्यांचे आंदोलन खासदार सुनिल मेंढे यांची मध्यस्थी

**भंडारा । प्रतिनिधी**

त्रिमूर्ती चकात साकोली येथील शुभलक्ष्मी एंटरप्राइजेसच्या विरोधात अभिकर्त्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला खासदार सुनिल मेंढे यांनी भेट दिली. या आंदोलनामध्ये नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करण्यात आली होती.

आंदोलनकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते, ज्यामुळे या प्रकरणाची गंभीरता लक्षात आली.पूर्व खासदार सुनील मेंढे यांच्या मध्यस्थीमुळे पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांच्यासोबत चर्चा करून आंदोलन मागे घेण्यात आले. त्यांनी फसवणूक झालेल्या नागरिकांचे पैसे परत मिळवून देण्याचे आश्वासन दिले.अभिकर्त्यांनी एक निवेदन



दिल्यानंतर पूर्व खासदार मेंढे यांनी त्यांची मागणी ऐकली आणि उपोषणकर्त्यांना लिंबू पाणी पिण्यासाठी आमंत्रित केले. त्यावेळी त्यांनी लोकांचा विश्वास जपण्याची वचनबद्धता व्यक्त केली.

या प्रसंगी विनोद बांते, सुर्यकांत इलमे, मंगेश वंजारी यांच्यासह अनेक स्थानिक नेते उपस्थित होते. पूर्व खासदार मेंढे यांनी यावेळी स्पष्ट केले की, फसवणूक झालेल्या नागरिकांना न्याय मिळेपर्यंत ते या प्रकरणाची मागोवा घेणार आहेत. संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून नागरिकांचे पैसे परत मिळवणे हे प्राथमिक लक्ष्य असल्याचे त्यांनी सांगितले.

## विविध उपक्रमांनी साजरी झाली श्री संत झिंगुजी महाराजांची ८५ वी पुण्यतिथी

**भद्रावती । प्रतिनिधी**

श्री संत झिंगुजी महाराज देवस्थान समितीच्या वतीने श्री संत झिंगुजी महाराज यांचा ८५ वा पुण्यतिथी महोत्सव विविध धार्मिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाद्वारे पार पडला .

सदर महोत्सवाच्या पहिल्या दिवशी घटस्थापना व श्री ची पूजा आरती, नगर स्वच्छता अभियान, डॉ.यशवंत पोईनकर व डॉ.सारंग लोणारे यांचे सौजन्याने दंत दंत चिकित्सा शिबिर, रांगोळी स्पर्धा व जागृती भजन घेण्यात आले.दुसऱ्या दिवशी योग्या नेत्रालय व सर्जिकल सेंटरचे नेत्रशल्य चिकित्सक डॉ. प्रशांत नागपुरे व डॉ. मोनिका नागपुरे यांच्या सौजन्याने नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले. यावेळी १२० रुग्णांची नेत्र तपासणी करून ५४ लाभार्थ्यांना चष्मे वितरीत करण्यात आले. सोबतच चित्रकला व वकृत्व स्पर्धा,सायंकाळी सत्कार समारंभ प्रशस्तीपत्र व बक्षीस वितरण तसेच गुणवंतांचा सत्कार घेण्यात आला. यावेळी राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष तथा माजी खासदार हंसराजभैय्या अहिर, चंद्रपूर जिल्हा भोई समाज सेवा संघाचे अध्यक्ष कृष्णाजी नागपुरे, माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर, श्री गुरुदेव प्रचारक विशाल गावंडे, मोरेश्वर खेडेकर यांची उपस्थिती होती.याप्रसंगी राष्ट्रपती पुरस्कृत आशा बावणे यांचा देखील सत्कार करण्यात आला. सायंकाळी सप्त खंजिरी राष्ट्रीय प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचे शिष्य ह.भ.प.इंजी.पवनपाल दवंडे महाराज अमरावती यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम पार पडला. शेवटी ह.भ.प.प्रा.अशोकजी चरडे महाराज यांचे गोपाल काल्याचे किर्तन व दहीहंडी, श्रीच्या पालखीची प्रमुख मार्गाने भजनदिंडीसह भव्य मिरवणूक , त्यानंतर भव्य महाप्रसाचा हजारो भाविकांनी व नागरिकांनी आस्वाद घेतला. या ३ दिवसीय कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आयोजन समितीच्या सर्व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले .

# विसापूर मध्ये संताजी जगनाडे महाराज ४०० वी जयंती महोत्सव उत्साहात

**विसापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे थोर संत, तेली समाजाचे आराध्य दैवत श्री. संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांचा ४०० वी जयंतीचा महोत्सव ८ डिसेंबरला विसापूरमध्ये तेली समाज बांधवांच्या वतीने उत्साहाने साजरा करण्यात आला.

माजी सरपंच बंडू गिरडकर व माजी सैनिक रामदास हरणे यांच्या हस्ते घटस्थापना करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे उदघाटन कविता गिरडकर, प्रमुख पाहुणे मोहिनी वरघणे व रविना ठाकरे, मोनिका शेंडे, अनिता कुईटे, मनीषा ढेंगरे, सुरेखा इटनकर, सविता इटनकर याच्या शुभहस्ते करून जगनाडे महाराज यांच्या जीवनावर आधारित मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रमात संतांचे योगदान विषयावर भाषण स्पर्धा, शिक्षणाचे महत्व विषयावर निबंध व ५ ते १३ वर्ष वयोगटात नृत्य स्पर्धा घेण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमात पर्यवेक्षिका म्हणून मोहिनी वरघणे शिक्षिका जि.प.उच्च प्राथमिक शाळा, पंचाळा उपस्थित होते. सायंकाळी ४ वाजता समाजबांधवांनी संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेची शोभायात्रा काढून गावातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. श्री. संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या ४०० वी जयंती महोत्सवात अध्यक्षस्थानी नरेंद्र इटनकर होते तर प्रमुख अतिथी म्हणून नरेश भोवरे वनपरिक्षेत्र अधिकारी बल्लारपूर, दिनेश वरघणे सर मुख्याध्यापक जि.प.हायस्कूल विसापूर उपस्थित होते.या प्रसंगी उपस्थित पाहुण्यांनी समाजबांधवांना जगनाडे महाराज यांच्या जीवनावर भर देऊन समाजाला नवी ऊर्जा देण्याच्या दृष्टीने प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले. समाजातील तरुणांनी संताजी जगनाडे महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पुढील वाटचाल करावी असा संदेश अंगीकृत करण्याच्या संकल्प या जयंतीच्या महोत्सव प्रसंगी घेण्यात आला व समाजाला संघटित करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन समाजाला सर्वांगीण विकासामद्धे पुढे नेण्याचे प्रभावी मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व सांस्कृतिक कार्यक्रमाचे बक्षिस वितरण करण्यात आले.

याप्रसंगी ग्रा.पं.सदस्य गजानन पाटणकर, तेली समाज उपाध्यक्ष दिनकर गिरडकर, सचिव अक्षय देशमुख, कोषाध्यक्ष नंदकिशोर गिरडकर, सहसचिव संतोष वैरागडे, संचालक रामदास हरणे, विजय गिरडकर, शंकर गिरडकर, अरुण बावणे, अशोक गिरडकर, विलास गिरडकर, विनोद गिरडकर, प्रफुल पोहाणे, प्रितम पाटणकर, कार्यक्रम नियोजन समिती अध्यक्ष अमोल खनके, उपाध्यक्ष राहुल बुटले, सचिव राहुल गिरडकर, सहसचिव कुणाल लोखंडे, कोषाध्यक्ष विठ्ठल साखरकर व तेली समाज युवा सदस्य, तेली समाज युवती मंच व सर्व तेली समाजबांधव उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अक्षय देशमुख, संचालन सुरेश इटनकर व आभार विठ्ठल साखरकर यांनी मानले.

# जासई विद्यालयात रायगड विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न

**उरण । विठ्ठल ममताबादे**

रयत शिक्षण संस्थेचा विद्यार्थी या स्पर्धेच्या युगात टिकून राहावा, त्याच्या अंगातील कलागुणांना वाव मिळावा व तो सर्वगुणसंपन्न व्हावा यासाठी संस्था पातळीवर अनेक उपक्रम व स्पर्धांचे आयोजित केले जाते. याचाच एक भाग म्हणून कर्मवीर विद्याप्रबोधिनी मार्फत श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज, दहागाव विभाग जासई येथे रायगड विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

रायगड विभागाचे विभागीय अधिकारी आणि या विद्यालयाचे प्राचार्य कोंगेरे एम.के.यांनी उपस्थित मान्यवर पाहुण्यांचे स्वागत करून या प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले व सहभागी विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील हे उपस्थित होते, तसेच विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन केले गेले. रयतच्या रायगड विभागातील २४ शाळांचे संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते, दिवसभर या स्पर्धेच्या विविध फेऱ्या पार करून, या रायगड विभागीय पातळीवर प्रथम क्रमांक गव्हाण शाखा, द्वितीय क्रमांक वावंजे शाखा, तृतीय क्रमांक जासई शाखा आणि उत्तेजनार्थ उलवे शाखा यांनी यश संपादन केले.ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विभागीय कार्यालयातील ओ.एस.गुजर सर, वैभव गावंड सर तसेच या स्पर्धेचे समन्वयक डी.सी.पाटील, परीक्षक म्हात्रे टी.सी, सुहास नाईक, भाळे एस.एन, गणेश भोईर सर, नरेश भगत सर, वाजेकर एम.एस.या पूर्ण टीमने मेहनत घेतली. विद्यालयातील सर्व सेवकांनी या स्पर्धेसाठी आलेल्या सर्व स्पर्धक विद्यार्थी, शिक्षक व पाहुण्यांची चहापान नाश्ता व भोजनाची चोख व्यवस्था केले होती , विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे यांनी विद्यार्थ्यांना या जेवणासोबत गोड खाऊ दिला. या कार्यक्रमासाठी स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य नरेश घरत, महाराष्ट्र रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख आदित्य घरत इत्यादी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन घरत पी.जे.व प्रा. अतुल पाटील यांनी केले.



# संजय शिंदे विद्यालय भोगेवाडी शाळेस जिल्हास्तरीय कृतिशील शाळा पुरस्कार

**सोलापूर । विश्वास चोपडे**

सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज कोर्टी ता. पंढरपूर येथे जिल्हास्तरीय कृतिशील पुरस्कार वितरण सोहळा रविवार ८/१२/२०२४ रोजी पार पडला. मा.शिक्षक आमदार.दत्तात्रय सावंत सर यांच्या हस्ते संजय मामा शिंदे विद्यालय भोगेवाडी तालुका माढा जि सोलापूर या शाळेला कृतिशील शाळा हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.पुरस्कार वितरण प्रसंगी संजय मामा शिंदे विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री.नंदकुमार टोणपे सर सचिव मा.रोहन टोणपे ,मुख्याध्यापिका सौ प्रियंका सावंत मॅडम व सर्व शिक्षक,तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.





ग्रामीण भागातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्न करून विद्यार्थ्यांचे गुणवत्तेत भर पाडण्याचे काम आजपर्यंत विद्यालयाने केले .त्याचेच फल म्हणजे कृतिशील पुरस्काराने विद्यालयास सन्मानित करण्यात आले .त्यामुळे पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून विद्यालयाचे कौतुक होत आहे.

# पोलीस प्रशासनातर्फे मानवी हक्का बाबत जनजागृती

**उरण । विठ्ठल ममताबादे**

न्हावा शेवा पोलीस ठाणे हद्दीतील तुकाराम हरी वाजेकर येथे उच्च माध्यमिक विद्यालय येथील विद्यार्थी/विद्यार्थिनी व शिक्षकांना यांना मानवी हक्क दिन निमित्त समाजातील तळागाळातील जनतेला मानवी हक्काचे ज्ञान माहिती होणे व त्याबाबत जनजागृती करिता पोलीस प्रशासनातर्फे कार्यक्रम साजरा करण्यात आला. सदर वेळी म.स.पो.नी मोनाली चौधरी. (गुन्हे), म.पो.उप निरी. अश्विनी कांबळे यांनी मानवी हक्का बाबत माहिती दिली.मानवाचे हक्क, पोलीस दलाची माहिती त्याचप्रमाणे सायबर सुरक्षा व गुन्हे प्रतिबंध,व्यसन मुक्ती व अंमली पदार्थ प्रतिबंध, आर्थिक फसवणूक व प्रतिबंधक उपाय,जेष्ठ नागरिक सुरक्षा व काळजी, मुली,




महिला व बालकाची सुरक्षा, महिलांच्या विरोधातील घटना आदी संदर्भात पोलीस प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली तसेच नवी मुंबई पोलीस व्हॉट्सअप चॅनेले फॉलो करण्यास सांगितले व नागरिकांचे पोलिस मदतीसाठी डायल ११२ व साइबर फ्रॉड हेल्पलाईन १९३० क्रमांकाची माहिती देऊन त्याचा प्रसार नागरिकामध्ये करावा. यांसारख्या विषयांवर पोलीस अधिकाऱ्यांनी माहिती दिली

सदर वेळी मनोहर म्हात्रे (प्राचार्य ), वैजनाथ कुटे. (ज्यु कॉलेज प्रमुख ), दर्शना माळी (उप शिक्षिका ) तसेच ७० ते ८० विद्यार्थी आणि शिक्षक हजर होते.

# एम.आय.डी.सी.मधील उद्योजकांनी विविध समस्यांबाबत उपअभियंता यांना दिले निवदेन

## मागण्यांची पुर्तता न झाल्यास उद्योजक तीव्र स्वरुपाचे आंदोलन करणार–योगेश नेहुल

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नेवासा एम.आय.डी.सी. मधील उद्योजक व प्लॉट धारक एक वर्षापासून वेळोवेळी आपल्या कार्यालयात निवेदन देऊन, समक्ष भेटून व तोंडी सांगून देखील खालील समस्यांचे निराकरण झालेले नाही. तरी पुन्हा एकदा आम्ही सर्व उद्योजक आपणास विनंती करत आहेत की आमच्या समस्यांचे लवकरात लवकर निराकरण करण्यात यावे, अन्यथा आम्हाला सर्व उद्योजकांना घेवुन तीव्र स्वरुपाचे आंदोलन उभारावे लागेल असा इशारा नेवासा एम.आय.डी.चे अध्यक्ष योगेश नेहुल यांनी दिला आहे.



अहिल्यानगरच्या नेवासा येथील उद्योजकांच्या वतीने एम.आय.डी.सी.चे उपअभियंता संदिप बडगे यांना निवेदन देवुन त्यांच्याशी विविध समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी अध्यक्ष योगेश नेहुल, उपाध्यक्ष अमित कानडे, अनिरुद्ध घैसास, रुपेश नागे, वैभव ससे, निलेश पोखर्णा, गोरक्षनाथ दहातोंडे, समरप्रितसिंग मल्होत्रा, राजु पुंड, संभाजी नाचन, सदाशिवआप्पा बी.आर आदी उद्योजक उपस्थित होते.यावेळी बोलतांना उद्योजक अनिरुद्ध घैसास म्हणाले की, आम्ही उद्योजक खालील मागण्यांचे निवेदन देत आहोत. रस्त्याच्या दोन्ही बाजूस वेड्याबाभळी व इतर अनावश्यक झाडी वाढलेली आहेत, त्यामुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणावर अडथळा निर्माण होत आहे. सर्व रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब व दयनीय झालेली आहे, त्यामुळे दळणवळणास खूप त्रास होत आहे. पर्यायाने त्याचा आमच्या उद्योगावर परिणाम होत आहे. तरी सदरचे सर्व अंतर्गत रस्ते ताबडतोब दुरुस्त / नवीन करावेत जेणेकरून दळणवळण सोयीचे होईल. अनेक भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे, पर्यायाने बाहेरून विकत पाणी घ्यावे लागते व नाहक आर्थिक नुकसान होत आहे. रस्त्याच्या कडेला असलेले काही पथदिवे गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहेत तरी बंद असलेले दिवे ताबडतोब दुरुस्त करावेत. तसेच उर्वरित भागात नवीन पथदिवे लावण्यात यावेत जेणेकरून रात्रीच्या वेळेस ये जा करण्यास सोयीचे होईल व सुरक्षेच्या बाबत उपयोग होईल. या परिसरात बर्याच रस्त्यांच्या कडेला अनाधिकृत पणे टपर्या टाकून व्यवसाय करण्यात येत आहे, सदरचे अतिक्रमण ताबडतोब काढावे व ते पुन्हा होणार नाही असा बंदोबस्त करण्यात यावा. या औद्योगिक वसाहतीत आपले (चखऊउ) चे स्वतंत्र्य कार्यालय सुरु करावे जेणेकरून उद्योजकांना वेळोवेळी संपर्क साधून सोईचे होईल. या परिसरात चोर्या तचेच खंडणीचे प्रकार होत आहेत यासाठी येथे स्वतंत्र्य पोलीस ठाणे सुरु करावे, जेणेकरून गुन्हेगारीला आळा बसेल.

तरी वरील समस्यांचे लवकरात लवकर निराकरण करून त्या सोडवाव्यात, जेणेकरून येथील उद्योजकांना त्याचा लाभ होईल व आपला व्यवसाय वाढवण्यास मदत होईल. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा हि देण्यात आला.यावेळी बोलतांना उपअभियंता संदिप बडगे म्हणाले की, आपल्या मागण्यांच्या बाबत आम्ही लवकरच योग्य ती करवाई करु व जे जे शक्य असेल ते ते सर्व प्रश्न मार्गी लावण्यात येतील, असे उद्योजकांना आश्वासन दिले.

# प्लास्टिक बंदीसाठी प्रदूषण मंडळाची कडक कारवाई

## करमाळ्यात ५५ किलो प्लास्टिक जप्त




**सोलापूर । प्रतिनिधी**

केंद्रीय आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दर महिन्याला तपासणी मोहिमा राबविण्याचे निर्देश दिले आहेत. यानुसार डिसेंबर २०२४ साठी करमाळा नगरपरिषदेकडून बस स्थानक परिसरातील आस्थापनांवर एकल वापर प्लास्टिक बंदी मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान कार्यालयीन अधीक्षक धनंजय कविटकर, कर निरीक्षक स्वप्निल बाळेकर, आरोग्य विभाग प्रमुख विपुल पुजारी, शहर समन्वयक सचिन घाटूळे आणि अन्य कर्मचारी उपस्थित होते. मोहिमेत ५५ किलो एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आणि दंडात्मक कारवाईच्या अनुषंगाने नागरिकांना सूचना देण्यात आल्या. मुख्याधिकारी सचिन तपसे यांनी नागरिकांना सिंगल युज प्लास्टिकचा वापर थांबवून पर्यावरणपूरक कापडी आणि कागदी पिशव्या वापरण्याचे आवाहन केले. प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी अशा मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. ग्रामस्थ आणि व्यापाऱ्यांनी या मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन नगरपरिषदेकडून करण्यात आले आहे.

# सारणी येथे दत्तजयंती सोहळ्याचे आयोजन

# ह.भ.प मच्छिंद्र महाराज पळसकर यांची किर्तन सेवा

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सारणी (सांगवी) येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी शनिवार दि.१४ डिसें. रोजी दत्त जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या दत्त जयंती सोहळ्याचा लाभ घेण्याचे अवाहन सारणी (सां) येथील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.यादिवशी सकाळी ९-०० वा. भजन तसेच छत्रपती संभाजीनगर येथील हभप मच्छिंद्र महाराज पळसकर यांचे सकाळी १०-०० वा. ते १२-०० वा. या वेळेत किर्तन होणार आहे. १२-०० वा. महाप्रसादाचे आयोजन कराण्यात आले आहे. तरी यावेळी परिसरातील भाविक भक्तांनी उपस्थित रहाण्याचे आवाहन दत्तउपासक, दत्तभक्त इंद्रभान नारायण मुळे तसेत सारणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे

दत्तात्रेय हा अत्री ऋषी आणि त्याची पत्नी अनसूया यांचा मुलगा होता . अनसूया, एक प्राचीन पवित्र आणि सद्गुणी पत्नी, ब्रह्मा, विष्णू आणि शिव, हिंदू पुरुष ( त्रिमूर्ती ) सारख्या गुणवत्तेने मुलगा होण्यासाठी कठोर तपस (तपस्या) केली . सरस्वती , लक्ष्मी आणि पार्वती , देवी त्रिमूर्ती ( त्रिदेवी ) आणि पुरुष त्रिमूर्तींच्या पत्नी, हेवा वाटू लागल्या. त्यांनी तिच्या सद्गुणांची परीक्षा घेण्यासाठी त्यांच्या पतींना नियुक्त केले.तीन देव अनसूयेसमोर संन्याशांच्या वेशात हजर झाले आणि तिला नग्न अवस्थेत भिक्षा देण्यास सांगितले. अनसूया थोडावेळ गोंधळून गेली, पण लवकरच ती शांत झाली. तिने एक मंत्र उच्चारला आणि तिघांवर पाणी शिंपडले आणि ते बाळ झाले. त्यानंतर तिने आपल्या इच्छेप्रमाणे नग्नावस्थेतच त्यांना दूध पाजले. देवांचे त्रिकूट परत न आल्याने त्यांच्या पत्नी चिंताग्रस्त झाल्या आणि त्यांनी अनसूयेकडे धाव घेतली. देवींनी तिची क्षमा मागितली आणि तिला त्यांचे पती परत करण्याची विनंती केली. अनसूयाने त्यांची विनंती मान्य केली. त्यानंतर त्रिमूर्ती त्यांच्या खऱ्या रूपात अत्री आणि अनसूया यांच्यासमोर प्रकट झाली आणि त्यांना दत्तात्रेय नावाचा पुत्र दिला.दत्तात्रेय हे तिन्ही देवतांचे रूप मानले जात असले तरी, त्यांना विशेषतः विष्णूचे अवतार मानले जाते , तर त्यांचे भावंडे चंद्र-देव चंद्र आणि ऋषी दुर्वासा हे अनुक्रमे ब्रह्मा आणि शिवाचे रूप मानले जातात.





हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077